## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक — ५९४/२०२२/नंदुरबार**

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अशोक मदन प्रकाशकर<br>रा. १८, पटेलवाडी, कोरीटरोड, नंदुरबार,<br>ता.जि. नंदुरबार. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा,<br>वनक्षेत्रपाल,<br>वनक्षेत्रपाल नवापूर प्रादेशिक यांचे कार्यालय,<br>नवापूर, ता. नवापूर, जि. नंदुरबार. | : | प्रतिवादी |
| २ प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>सहाय्यक वनसंरक्षक,<br>सहायक वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव),<br>नंदुरबार यांचे कार्यालय, पंचायत समिती समोर,<br>नंदुरबार, ता.जि. नंदुरबार. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक — ०८/१२/२०२२**

अपिलार्थी यांनी दि. १६/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दि.०८/१२/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित-** सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दि. १६/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन १९९७ ते सन २०२१ या कालावधीतील सर्व योजना अंतर्गत वृक्ष लागवड, जलसंधारण, मृदसंधारणाची झालेल्या कामांच्या क्षेत्राची माहिती-कंपार्टमेंट नंबर/गट क्र., प्रस्तावित क्षेत्र, सदर क्षेत्राची अक्षांश/रेखांश व सदर क्षेत्र निवडीबाबत प्रपत्र पी-१ रोपवनांबाबत अंदाजपत्रकासोबत जोडावे लागणारे प्रमाणपत्र संबंधित सहाय्यक वनसंरक्षक यांनी दिलेले व सदर क्षेत्रावर दुबार योजना राबविली असल्यास संपूर्ण कागदपत्रे याबाबतची माहिती मिळण्याची विनंती केली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना विहीत मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसुन येत नाही.

तद्नंतर कोणतेही उत्तर न मिळाल्याने अपिलार्थी यांनी दि. १८/१०/२०२१ च्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेऊन दि. ०९/११/२०२१ रोजी, निर्णय

पारित करुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ३० दिवसात विनामुल्य पुरविण्याचे निर्देश देवुन प्रथम अपिल निकाली काढले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही विस्तुत स्वरुपाची असुन सदर कालावधीत नवापुर व नंदुरबार या दोन वनपरिक्षेत्रांचा कार्यभार असल्याने अपिलार्थीस दिनांक ०३/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती ही २१-२२ वर्षे पुर्वीची माहिती असल्याने सदर अभिलेखाची तपासणी केली असता अभिलेख अतिशय जिर्ण झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सदर माहितीचा शोध कार्य सुरू आहे. त्यामुळे माहिती देण्यास कमीत कमी दिड ते दोन महिने लागण्याची शक्यता असल्याचे कळविले होते. तसेच अपिलार्थी यांनी सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी अद्याप माहिती पुरविली नाही.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १६/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व २१-२२ वर्षा पुर्वीची असल्याने सदर माहितीचे अभिलेख जिर्ण झाल्याने सदर माहिती पुरविता आली नसल्याचे दिसुन येते. तसेच त्याबाबत अपिलार्थीस देखील अवगत करण्यात आले असल्याचे स्पष्ट होते. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहितीचे अवलोकन केले असता सदर माहिती वृक्ष लागवड, जलसंधारण, मृदसंधारणाचे झालेल्या कामांच्या क्षेत्राची माहिती इत्यादी माहिती असल्याने सदर माहिती ही तक्ता स्वरुपात देता येऊ शकते. तथापि, या प्रकरणी अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. त्यामुळे आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती मुद्दे निहाय तक्ता स्वरुपात पुरविणे योग्य होईल. तसेच जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारण नमुद करणे योग्य होईल.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनक्षेत्रपाल नवापूर प्रादेशिक यांचे कार्यालय, नवापूर, श्रीमती एस.सी. अवसरमल यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६/०९/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध मुद्येनिहाय माहिती नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती पुरविता येत नाही त्याबाबत स्पष्ट कारणे देखील कळविण्यात यावीत.

२) वरील आदेशांसह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक ५९४/२०२२/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

१) उप वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव), नंदुरबार यांचे कार्यालय, पंचायत समिती समोर, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार.
यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

**क्रमांक : रामाआ- नाशिक/द्वि.अ.क्र./५९४/२०२२/नंदुरबार ओ-** 233 **दिनांक-** 22/02/2023